# महिन्याचा विचार

अर्थात हे प्रथमदर्शनी दिसते तितके सोप्पे नसते. मनात आवडी–निवडी वास करीत असतात. समोर दिसते त्याला अन्न मानायची सवय पंचेंद्रियांना लागली असते. त्याच्यामागे धावण्यासाठी मन सदैव सज्ज असते आणि इंद्रिये तर गोंधळ घालायला तयारच असतात. भगवंताच्या उपस्थितीत याला अस्तित्व नसते. तेथे इतरांवर अविरत प्रेम हाच निकष असतो कारण भगवंत सर्वांमध्ये वास करीत असतो.

अध्यात्माच्या अभ्यासकाला भगवंताला सर्वांभूती बघण्याची अशी सवय लावून घ्यावी लागते. गुरूदेव म्हणत–भगवंत म्हणजेच दिव्यत्व! ''उत्तिष्ठ, डोक्यावरील भव्य, अथांग निळ्या अवकाशाकडे बघ. ते तुला ईश्वराची आठवण करून देत नाही का? दैदिप्यमान, तेजस्वी सूर्याकडे एक नजर टाक. त्याच्यात तुला स्वत:चा तेज:पुंज आत्मा दिसत नाही का? गंगेकडे टक लावून बघ. तेथे तुला देव दिसत नाही का? मनाने या ईश्वर रूपांकडे पाहा. मग हळूहळू नजर विशाल कर. आसपासच्या घोड्यांमध्ये आणि गाढवांमध्ये ईश्वर बघ. मनातील पापशंका घालव. ज्याला मनातून तू शिव्या घालीत असतोस अशी व्यक्ती समोर दिसली तर मनोमन जप कर– ''ध्युत छलयतामस्मि'' (मी फसविणाऱ्याचा जुगार आहे). त्या व्यक्तीमध्येही भगवंत पाहा आणि क्षणार्धात तुच्छता नाहीशी होईल. तुम्ही डाकूच्या तिरस्कार करणार नाही किंवा त्याची तुम्हाला भीतीदेखील वाटणार नाही. कारण दस्तुरखुद्द भगवंत त्याच्यामध्ये असेल – ''तस्करांना पत्ये नम:'' हळूहळू सर्वदूर भगवंताचे अस्तित्व तुम्हाला प्रत्ययाला येईल. या साधनेला मदत करण्यासाठी आणि तिची गती वाढविण्यासाठी गुरूदेवांनी साधकांना एखादा मंत्र, श्लोक, अथवा सूत्र निवडण्यास सांगितले आहे. उदा–आकाश **''आकाशवत् सर्वागत नित्य''**(ब्रह्मन् सर्वत्र असते आणि आकाशाप्रमाणे अनंत असते.)

आणि सुर्य – **''पुषन्नेकर्षेयाम सुर्या प्रजापत्या व्युहारस्मिन संमोह तेजो यत्तेरूपं कल्याणतमांतत ते पश्यामि योसावसौ पुरूषस–सोहमास्मि''**

(तेजोनिधी, आमचा पालनहार, स्वर्गातील एकमेव प्रवासी, सर्वांचा नियंता, प्रजापतीच्या पुत्रा तुझे किरण पसरू देत आणि तुझा प्रकाश साऱ्या आसमंताला उजळून टाकू देत. मी तुझ्या गौरवशाली रूपाचा मी अंश आहे. मी तुझ्यातील पुरुष आहे.)

आणि अग्नी, प्रकाश–

**ज्योतिषमपि तत ज्योति: तमस: परमुच्यते**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं इरिडी सर्वस्यतिष्ठितं**

(तो, सर्व प्रकाशांचा प्रकाश, अंध:काराच्या पलीकडे असतो, ज्ञान ज्ञात आणि ज्ञानाचा हेतू सारं काही सर्वांच्या हृदयात वसलेले असते.) क्रमशः

**Last Days of Swami Sivananda**

On June 25, doctors from Dehra Dun and Lucknow examined him. The Master attempted to speak, but his articulation was not distinct. The Dehra Dun doctor spoke softly, “Swamiji, you should not worry about anything. You should not think anything.” Quick came the answer, “Oh, how can it be possible? I’ve to think of many things. I’ve to take care of so many people.” That was only one facet of the Master’s extraordinary personality, a facet which showed the shepherd’s concern for his flock. The other facet, the transcendental consciousness of the Divinity that was Sivananda, was totally different. Only a year earlier, the Master had remarked to a disciple, quite casually, “I cannot think,” hinting thereby that he had attained a realm which thought did not touch and where the mind was no more. At about noon, Colonel M.S. Rao, then personal physician to the Indian President, came racing from Delhi. “How are you, Swamiji?” To this kind query of the doctor, Sivananda replied, “I am perfectly all right.”

It was characteristic of the Master. When anyone enquired about his health, he would invariably say,

"Most wonderful!" How else could it be for one who was all the time in unbroken communion with the Lord? The Master conversed affably with the doctor and took his food. The same evening, however, he experienced difficulty in swallowing. He was not able to take even the medicinal tablets. They were powdered, mixed with honey and administered to him as a paste. It was July 6, 1963, Guru Purnima day. No one was allowed inside Sivananda's cottage. Ashram inmates and visiting devotees solemnly celebrated the sacred occasion in the Ashram premises outside. The same afternoon, as a disciple helped the Master turn in his bed, he asked him if he wanted anything. "Nothing," said the Master, and after a while, recited the following lines from the Brahma Sutras of Bhagavan Vyasa and the Yoga Darshana of Maharishi Patanjali:

**Tattu samanvayaat**
**Tasya vachakah pranavah**
**Sa tu deerghakala-nairantarya**
**Satkaaraasevito dridhabhoomih.**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ✻ मे २०२३ चा सत्संग १४ तारखेला संपन्न झाला.
- ✻ 'दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा मे २०२३ चा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १८/अंक ६
जून २०२३

Direct knowledge of the Self is not possible without the practice of concentration and meditation. You will have to make a conscious inward search and fix the mind on the Supreme Self after purifying and steadying the mind by the practice of the fourfold means.

**Swami Sivananda**

Positivity, optimism, enthusiasm and keen interest are ingredients of a mind which becomes the best asset to you in life.

**Swami Chidananda**